**ठळक बातम्या**

- देश आठ टक्के वेगाने प्रगती करीत असून अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रावर यंदाच्या अर्थसंकल्पात लक्ष दिलं असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज संध्याकाळी लोकसभेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तर देणार

- रशिया आणि युक्रेन या दोन्ही देशांसोबत भारत सरकार संपर्क वाढवणार असून त्यामुळे त्यांच्यातला संघर्ष निवळण्यासाठी हातभार लागेल, असा परराष्ट्रव्यवहार मंत्र्यांना विश्वास

- केरळमधे वायनाड जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे दरड कोसळून ३६ जणांचा मृत्यू, किमान ६६ जखमी/ केंद्रसरकारकडून दुर्घटनाग्रस्तांना मदत जाहीर

**आणि**

- पॅरिस ऑलिंपिकमधे नेमबाजीत मनु भाकर आणि सरबजोत सिंगच्या जोडीला कांस्यपदक

**<><><><><>**

देश आठ टक्के वेगाने प्रगती करीत असून अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रावर यंदाच्या अर्थसंकल्पात लक्ष दिलं असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. कॉन्फेडरेशन ऑफ इंडीयन इंडस्ट्रीज या उद्योजक संघटनेनं आज नवी दिल्लीत आयोजित केलेल्या चर्चासत्रात ते बोलत होते. २०२४-२५ च्या अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या चर्चासत्राचा विषय आहे, विकसित भारताच्या दिशेने वाटचाल. विकसित भारताच्या दिशेनं वाटचाल करताना

सरकारची आर्थिक विकासविषयक उद्दिष्टं आणि उद्योगांची भूमिका याबद्दल या कार्यक्रमात चर्चा होणार आहे.

<><><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज संध्याकाळी लोकसभेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तर देणार आहेत. निर्मला सीतारामन यांनी २३ जुलै रोजी संसदेत केंद्रीय अर्थसंकल्प मांडला होता. त्यावर गेल्या काही दिवसांपासून संसदेच्या दोन्ही सभागृहात अर्थसंकल्पावर चर्चा सुरु आहे.

<><><><><>

कृषि पायाभूत सुविधा निधी अंतर्गत देशभरात ७६ हजार कोटी रुपयांचे ७२ हजार पायाभूत सुविधा प्रकल्प उभारण्यात आल्याचं केंद्रीय कृषि मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे. लोकसभेत पुरवणी प्रश्नांना उत्तर देताना त्यांनी ही माहिती दिली. या योजनेअंतर्गत बँका आणि वित्तीय संस्थांद्वारे पात्र कर्जदारांना १ लाख कोटी रुपये देण्यात आले असल्याचं त्यांनी सांगितलं. शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांसाठी योग्य भाव मिळावा यासाठी सरकार साठवणीची योग्य व्यवस्था करत असल्याचं ते म्हणाले. देशाचा कृषी विकास दर सुमारे चार टक्के असून देशात अन्नधान्याचा मुबलक साठा असल्याचं त्यांनी सांगितलं.

उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजनेचा फायदा सुमारे १७६ सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना झाल्याचं सरकारनं म्हटलं आहे. वाणिज्य आणि उद्योग राज्यमंत्री जितीन प्रसाद यांनी पुरवणी प्रश्नांना उत्तर देताना ही माहिती दिली. या योजनेअंतर्गत आतापर्यंत १ लाख ३२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असल्याचं त्यांनी सांगितलं. तसंच या योजनेमुळे साडे ८ लाखांहून अधिक रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या असून त्यामुळे ११ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त उत्पादन आणि विक्री झाल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

केंद्रीय ग्राहकव्यवहार, अन्न आणि सार्वजनिक पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्यावर टीका केली आहे. अर्थसंकल्पावर चर्चेदरम्यान राहुल गांधी यांनी केंद्र सरकारने चक्रव्यूह रचल्याचं म्हटलं होेतं. त्यावर काँग्रेसचे गैरव्यवहार आणि भ्रष्टाचाराच्या विरोधात केंद्र सरकारनं चक्रव्यूह रचला असल्याची प्रतिक्रीया त्यांनी दिली. आज संसद परिसरात प्रसारमाध्यमांशी ते बोलत होते.

**<><><><>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीने सत्तेवर आल्यानंतर देशाच्या कमकुवत अर्थव्यवस्थेला जगातल्या पहिल्या पाच अर्थव्यवस्थांच्या रांगेत नेऊन बसवलं, असं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी सांगितलं. रालोआ सरकार अर्थव्यवस्थेची स्थिती हाताळण्यात अपयशी ठरलं आहे, या लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपाला उत्तर देताना गोयल नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलत होते. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळात महागाई दर गगनाला भिडल्यामुळे अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर ४ पूर्णांक ४ दशांश टक्क्यापर्यंत खाली घसरला होता, असंही गोयल म्हणाले. यूपीएच्या काळात देशात मोठी वित्तीय तूट निर्माण झाली होती, परकीय चलनसाठा मर्यादित होता, भ्रष्टाचार बोकाळला होता, मात्र आता जगाच्या आर्थिक विकासाचं नेतृत्व म्हणून जग भारताकडे आशेनं बघत असल्याचं गोयल यांनी सांगितलं.

**<><><><>**

भारत आगामी काळात रशिया आणि युक्रेन या दोन्ही देशांसोबत संपर्क वाढवेल, या दोन देशातला संघर्ष निवळण्यासाठी हा संपर्क महत्वाचा ठरेल असं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी सांगितलं. जपानमधल्या राष्ट्रीय क्लबमध्ये, वार्ताहरांनी

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पुढच्या महिन्यातल्या युक्रेन दौऱ्याविषयी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. भारत आणि युक्रेन तसंच भारत आणि रशिया यांच्यात अधिकाधिक संपर्क होईल, अशी आशा जयशंकर यांनी व्यक्त केली. तसंच युद्धाच्या मैदानात रशिया आणि युक्रेन संघर्षावर तोडगा निघणार नाही, असा भारताला विश्वास आहे, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

केरळच्या वायनाड जिल्ह्यातल्या मुंडक्काई, अट्टामाला आणि चूरमाला या भागात मुसळधार पावसामुळे आज दरड कोसळून ३६ जणांचा मृत्यू झाला तर ६६ जण जखमी झाले. या भागात अद्यापही अनेकजण अडकले असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. वाहून गेलेले १० मृतदेह मल्लपुरम जिल्ह्यात पोथ्थुकल इथं चलियार नदीत सापडले आहेत. या भागात बचावकार्य करण्यासाठी एनडीआरएफचं पथक दाखल झालं असून वैद्यकीय मदतीसह लष्कराचे जवानही दाखल झाले आहेत. मुंडक्काई हा डोंगराळ प्रदेश असून त्याला जोडणारा चुरक्कल इथला पूल वाहून गेल्यानं बचावकार्यात अडचणी येत आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेविषयी शोक व्यक्त केला असून मृतांच्या कुटुंबांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येकी दोन लाख रुपयांची तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे. केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्याशी संवाद साधून केंद्राकडून सर्वतोपरी मदत देण्याचं आश्वासनही प्रधानमंत्र्यांनी दिलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही समाज माध्यमावरच्या संदेशातून शोक व्यक्त केला आहे तसंच जखमींच्या प्रकृती स्वास्थ्यासाठी कामना केली आहे. गृहमंत्री अमित शहा आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही या दुर्घटनेबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आहे. या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर राजनाथ सिंह यांनी आज

लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्याशी चर्चा केली असून बचावकार्यासाठी अधिक लष्करी मदत पाठवण्यात येत आहे.

**<><><><>**

वायनाड इथं झालेल्या भूस्खलन दुर्घनटेत बचावकार्य करण्यासाठी केंद्र सरकारनं सर्वतोपरी सहकार्य करावं अशी विनंती लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी केली आहे. शून्य प्रहरात हा मुद्दा गांधी यांनी उपस्थित केला.

**<><><><>**

उत्तराखंडच्या उत्तरकाशी जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे गंगोत्री- यमुनोत्री महामार्गावर चिखल आणि पाणी आलं आहे. त्यामुळे या महामार्गावरच्या वाहतूकीत अडथळा आला आहे. गंगोत्री राष्ट्रीय महामार्गावर नाकुरी कालव्यातून आलेल्या पाण्याच्या जोराने जवळपासच्या भागाचं नुकसान झालं आहे. यमुनोत्री राष्ट्रीय महामार्गावर चिखल आणि पाण्यामुळे वाहतूकीवर परिणाम झाला आहे. NHAI आणि BROT च्या तुकड्या महामार्ग मोकळा करत आहेत. पावसामुळे शेतीचंही मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे.

**<><><><>**

येत्या 3 - 4 दिवसात देशाच्या वायव्य भागातल्या विविध राज्यांमध्ये मान्सून पुन्हा सक्रिय होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे . हिमाचल प्रदेश, उत्तराखंड , जम्मू काश्मीर, लडाख, पंजाब, हरियाणा, छत्तीसगड, दिल्ली, उत्तरप्रदेशचे आणि पश्चिम राजस्थानात सर्वदूर पाऊस पडण्याची शक्यता असून, तुरळक ठिकाणी अतिमुसळधार पाऊस अपेक्षित आहे. तसच येत्या 2 ऑगस्टपर्यंत कोकण, गोवा, मध्यप्रदेश, दक्षिण कर्नाटकाचा दुर्गम भाग आणि किनारी प्रदेश इत्यादी भागात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

<><><><><>

भारतीय नेमबाज मनु भाकर आणि सरबजोत सिंग या जोडीनं पॅरिस ऑलिपिंकमधे १० मीटर एअर पिस्तुल प्रकारात मिश्र दुहेरी गटातं कांस्य पदक पटकावलं आहे. या बरोबरच स्वातंत्र्योत्तर काळात एकाच क्रीडा प्रकारात एकाच स्पर्धेत दोन पदकं मिळवणारी मनु भाकर ही पहिली भारतीय खेळाडू ठरली आहे.

भारतीय टेबलटेनिसपटू मनिका बात्राने उपउपान्त्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. दुसऱ्या फेरीत काल तिने फ्रान्सच्या पृथिका पावडेचा ११-९, ११-६, ११-९, ११-७ अशा गुणफरकाने पराभव केला.

हॉकी मध्ये काल पूल बी सामन्यात भारताचा सामना अर्जेंटीना संघाशी होऊन तो बरोबरीत सुटला. आज भारतीय हॉकी संघाची गाठ आता आयर्लंड शी पडणार आहे.

बॅडमिंटन पुरुष  दुहेरी मध्ये भारताच्या सात्विक साईराज रांकी रेड्डी आणि चिराग शेट्टी  या जोडीने उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश केला आहे. ऑलिंपिक स्पर्धांमध्ये या फेरीत प्रवेश करणारी ही पहिलीच भारतीय जोडी ठरली आहे. बॅडमिंटन मध्ये भारताच्या  लक्ष्य सेन  याने  पुरुष एकेरीच्या ग्रुप एल  मधे काल  बेल्जियमचा जूलियन कैरागी याला  २१-१९, २१-१४ ने हरवून आपला पहिला विजय नोंदवला. लक्ष्य सेन चा सामना आज  आशियाई विजेता जोनाथन क्रिस्टी याच्याशी होईल.

//<><><><><>//